# विसाव्या शतकातील नैतिक समस्या

श्रीनिवास हेमाडे

''खरे सत्य बोला यथा तथ्य चाला '' किंवा ''बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले ' यासारख्या आदर्शवादी नैतिक नियमाप्रमाणे सर्वानी वागावे, ही अपेक्षा असते; परंतु प्रत्यक्ष व्यवहारात तसे घडू शकत नाही. कारण वास्तव जीवन इतके साधे,सरळ असू शकत नाही.अनेकदा खोटे बोलावे लागते,मनाविरूध्द निर्णय घ्यावा लागतो.मग नीतीविचार लवचिक बनतो.कधी कधी तर '' आपण अनैतिक तर वागत नाही ना ? '' अशी भितीही वाटते.पण त्याचवेळेस '' आपण बरोबरच वागत आहोत '' असेही वाटत असते.उदाहरणार्थ खरे बोलावे, हे बरोबर असले तरी गंभीर आजार झालेल्या व्यक्तिला तिच्या आजाराबाबत खोटे बोलणे चूक समजले जात नाही; पण घरगुती राजकारणापासून ते सत्तेच्या राजकारणापर्यंत जणू काही 'खरे बोलू नये', हाच नैतिक नियम बनू पाहतो.

अशा वेळेस नेमके काय करावे ? असा नैतिक पेच निर्माण होतो. विसाव्या शतकात जवळपास सर्वच क्षेत्रात असे अनेक प्रकारचे नैतिक पेचप्रसंग निर्माण झाले. विसावे शतक हे मानवजातीच्या आयुष्यात अतिशय महत्वाचे पण भयानक वेगवान,गतिमान ठरले.या शतकातच विज्ञान व तंत्रज्ञानातील अनेक महत्वाचे व मूलगामी शोध लागले. एकीकडे जीवन सुखकर झाले पण त्याचवेळी पहिले व दुसरे महायुध्द,हिरोशिमा व नागासाकी या शहरांवरील अणुबॉम्ब हल्ला,1960 च्या दशकातील अमेरिकेतील वंशभेद,वर्णभेद व विषमतेचे मुद्दे,व्हिएतनामचे युध्द, स्त्रीमुक्ति चळवळ इत्यादीनी नीतीशास्त्रापुढे अनेक आव्हाने उभी केली. मुख्यतः मानवी हक्काचा प्रश्न पुढे आला.

विशेषतः 1990 नंतर जागतिकीकरणाच्या लाटेने आणखी नवे नैतिक प्रश्न निर्माण केले.रासायनिक - आण्विक - जैविक शस्त्रांस्त्रांचा शोध,संगणकीय यंत्रणा,जैवतंत्रज्ञान,माहिती तंत्रज्ञान यांचा विकास, तसेच मोठ्या धरणांचे महाप्रकल्प, नदीजोड प्रकल्प, एसईझेड इत्यादीबाबतची प्रगत देशांची धोरणे; त्या धोरणांचे इतर देशांवर होणारे अतिक्रमण; त्याचप्रमाणे व्यक्तिगत पातळीवर सामाजिक विषमता, अन्याय, आत्महत्या, गर्भपात,घटस्फोट, विवाहनीती, स्वेच्छामरण, फाशी, प्राण्यांचे मुक्ति आंदोलन,शाकाहारवाद हे प्रश्न ऐरणीवर आले.

युरोपातील महायुध्दांमुळे प्रचंड अमानुष नरसंहार झालाच परंतु शेती व पर्यावरण प्रदूषण झाले, शेतजमीन नष्ट झाली,अन्नधान्याचा तुटवडा झाला.परिणामी त्यांचे रेशनिंग करावे लागले (अशा तऱ्हेने गरीब राष्ट्रांच्या माथी कायमचे रेशनिंग कार्ड मारले गेले ! ) खास करून महाकाय धरणे,नदीजोड,वीजनिर्मिती प्रकल्पांनी पर्यावरण,शेती आणि शेतजमीन विषयक नव्या समस्या निर्माण केल्या.त्यात शेतीपूरक रासायनिक उद्योगधंदे आणि तंत्रज्ञान यांनी त्या समस्या जास्त तीव्र केल्या.चालू दशकात जंगलांचे सपाटीकरण,खेड्यांचे उद्ध्वस्तीकरण, दिशाहीन शहरीकरण आणि बेसुमार औद्योगिकीकरण, कार्पोरेटीकरण तसेच दहशतवाद आणि त्याला जोडले गेलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान यामुळे आणखी विपरित परिणाम झाला.दहशतवादी भागात शेतीविकास होवू शकत नाही आणि बॉम्ब,विषारी धूर इत्यादी शस्त्रास्त्रांमुळे पर्यावरण बिघडते.

अशा जटील समस्यांसंबंधी नैतिक निर्णय घेताना केवळ शुध्द चारित्र्य, सद्हेतू, सद्सदविवेकबुध्दि, परोपकारवाद इत्यादी आदर्शवादी नैतिक धोरणांचा उपयोग नसतो. हे निर्णय घेण्यासाठी संबंधित विषयातील तज्ञ ा,विशेषज्ञ आणि तत्त्ववेत्ते यांचे सहकार्य आवश्यक आहे.असे सहकार्य देणारी आणि या समस्यांचा नैतिक दृष्टिकोनातून सुव्यवस्थित अभ्यास करणारी नीतीशास्त्राची शाखा विसाव्या शतकात विकसित झाली.तिला ' व्यावहारिक किंवा उपयोजित नीतीशास्त्र ' (Practical or Applied Ethics) म्हणतात.